पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. महिला व बालकल्याण समिती सभा

कार्यपत्रिका क्रमांक – ७

**सभावृत्तांत**

दिनांक - **२३/१२/२०१५** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **२३/१२/२०१५** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. गोफणे अनुराधा देविदास
२) मा. नेटके सुमन राजेंद्र
३) मा. लांडे श्रध्दा बाजीराव
४) मा. ठोंबरे सुभद्रा ईश्वर
५) मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
६) मा. अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.खांडकेकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.गावडे – सह आयुक्त, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.जगदाळे – सहा.प्रकल्प अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक - मा.सुमन नेटके अनुमोदक - मा.सुभद्रा ठोंबरे

सभा कामकाज भरवणेसाठी नेमलेल्या वेळी मा.सभापती हे सभागृहात उपस्थित नसल्याने मा.महिला व बालकल्याण समिती सदस्य मा.लांडे श्रध्दा बाजीराव यांची सभाध्यक्ष म्हणून निवड करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(मा.लांडे श्रध्दा बाजीराव यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.१) पाच वर्ष कार्यरत असलेल्या बचत गटांना १०,०००/- रुपये अनुदान देणेबाबत - मा.सुमन नेटके, मा.सुभद्रा ठोंबरे यांचा प्रस्ताव.

----------

**खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.सुभद्रा ठोंबरे

शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांचे नुकतेच दु:खद निधन झाले असलेने त्यांस आजचे सभेत श्रध्दांजली वाहण्यात यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**( दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून सर्वांनी श्रध्दांजली अर्पण केली )**

**----------**

**खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.सुभद्रा ठोंबरे

क्षेत्रीय सभेमध्ये महिला बाल कल्याण सभापती सौ.गिता मंचरकर यांच्या सोबत जी घटना घडली या गोष्टीचा निषेध म्हणून सभा बुधवार दिनांक १३/०१/२०१६ रोजी दुपारी २.४५ वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभाध्यक्ष -** बुधवार दिनांक १३/०१/२०१६ रोजी दुपारी २.४५ वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( लांडे श्रध्दा बाजीराव )**
**सभाध्यक्ष**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा. महिला व बालकल्याण समिती सभा
कार्यपत्रिका क्रमांक – ७

**सभावृत्तांत**

( दिनांक २३/१२/२०१५ ची तहकूब सभा )

दिनांक - **१३/०१/२०१६** वेळ - दुपारी **२.४५** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची दिनांक २३/१२/२०१५ ची तहकूब सभा बुधवार दिनांक **१३/०१/२०१६** रोजी दुपारी **२.४५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा. गिता सुशिल मंचरकर - सभापती**
२) मा. गोफणे अनुराधा देविदास
३) मा. जवळकर वैशाली राहुल
४) मा. शितोळे शैलजा बाबुराव
५) मा. लांडे श्रध्दा बाजीराव
६) मा. ठोंबरे सुभद्रा ईश्वर
७) मा. अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.खांडकेकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.बेंडे - प्रशासन अधिकारी, मा.लांडगे – भांडारपाल, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.बहाद्दरपुरे - सहा.समाज विकास अधिकारी, मा.जगदाळे – सहा.प्रकल्प अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक ०९/१२/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक ६ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक - ११ विषय क्रमांक - ०१

दिनांक - १३/०१/२०१६

सुचक - मा.सुमन नेटके अनुमोदक - मा.सुभद्रा ठोंबरे

संदर्भ - मा.सुमन नेटके, मा.सुभद्रा ठोंबरे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड शहरामध्ये जे बचत गट ५ वर्षे पुर्णत: सातत्याने कार्यरत आहेत. अशा गटांना प्रोत्साहनपर अनुदान (र.रु.१०,०००/-) देण्यात यावे. जरी यापूर्वी दीड वर्षे पुर्ण झालेल्या गटांना आपण अनुदान दिले असले तरी पुढील पाच वर्षे पुर्ण झालेल्या गटांना अनुदान देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( गिता सुशिल मंचरकर )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ २५ /२०१५
दिनांक : १४/०१/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.